मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » सोमवार, दि. 8 जुलै 2024 | पान- 1

# बांगलादेशी घुसखोरांचे पासपोर्ट रद्द

## पिंपरी- चिंचवड पोलिसांमुळे 42 बांगलादेशींचे पासपोर्ट रद्द: बनावट कागदपत्रांच्या आधारे बनवले भारतीय पासपोर्ट

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्रात बेकायदेशीरपणे घुसखोरी करून बांगलादेशी राहत असल्याचे अनेकदा उघड झाले आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे भारतीय पासपोर्ट देखील त्यांच्याकडून हस्तगत केल्याची अनेक उदाहरणे आहेत. पिंपरी-चिंचवड एटीबीने (दहशतवाद विरोधी पथकाने) ४२ घुसखोर बांगलादेशींचे भारतीय पासपोर्ट रद्द करण्यात यश मिळवले आहे.

जानेवारी महिन्यात एटीबीला निगडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत पाच बांगलादेशी राहत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. निगडी पोलिसांनी त्यांचा शोध घेऊन त्यांना अटक केलं होतं. याच दरम्यान, त्यांच्या संपर्कात असलेल्या पासपोर्ट एजंटची देखील चौकशी पोलिसांनी केली. २०१५ पासून तो पासपोर्ट एजंट बांगलादेशीच्या संपर्कात होता. पोलिसांनी माहिती घेऊन आणि मोबाईलच्या आधारे ४२ बांगलादेशींचे पासपोर्ट रद्द करण्यासाठी प्रादेशिक पासपोर्ट ऑफिस पुणे यांना पिंपरी- चिंचवड एटीबी, परदेशी नागरिक नोंदणी विभाग आणि विशेष शाखा दोन यांच्या मदतीने पत्रव्यवहार करण्यात आला होता. त्यांना याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली होती.

४२ पासपोर्ट हे बनावट कागदपत्रांच्या आधारे बनवण्यात आले होते. हे प्रकरण अत्यंत संवेदनशीलपणे हाताळून पुणे पासपोर्ट ऑफिसने ४२ बांगलादेशी घुसखोरांचे भारतीय पासपोर्ट रद्द केले आहेत. या सर्व प्रकियेला सहा महिने लागले आहेत. ही कामगिरी पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

दहशतवाद विरोधी शाखा व परदेशी नागरिक नोंदणी विभाग, विशेष शाखा -२ यांच्या मदतीने प्रादेशिक पासपोर्ट कार्यालय, पुणे येथे पत्रव्यवहार करण्यात आला. बनावट कागदपत्रांच्या आधारे प्राप्त केलेले ४२ पासपोर्ट रद्द करण्यासाठी विनंती करण्यात आली. त्यानुसार प्रादेशिक पासपोर्ट कार्यालयाने याबाबत पडताळणी करीत, ४२ पासपोर्ट रद्द केले.




### पिंपरी चिंचवड पोलिसांच्या पाठपुराव्याला यश

» प्रादेशिक पासपोर्ट ऑफिस, पुणे यांनी पडताळणी करुन ४२ भारतीय पासपोर्ट रद्द केल्याबाबतचे आदेश २ जुलै रोजी काढले आहेत. त्यामुळे पिंपरी चिंचवड पोलिसांच्या पाठपुराव्याला यश आले आहे. ही उल्लेखनिय कामगिरी पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, अपर आयुक्त वसंत परदेशी, उपायुक्त संदीप डोईफोडे, स्वप्ना गोरे, डॉ. शिवाजी पवार, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन लांडगे, दहशतवाद विरोधी शाखा, निगडी पोलीस ठाण्यातील तपास अधिकारी सहायक निरीक्षक अंबरिष देशमुख यांच्या पथकाने केली आहे.

### कसे बनवितात पासपोर्ट?

» हे घुसखोर भारत-बांगलादेश बॉर्डरवरून भारतात प्रवेश केल्यानंतर ते त्या ठिकाणी असणा-या बॉर्डरवर असणा-या जिल्ह्यातील बनावट शाळा सोडल्याचा दाखला, डोमीसाईल इत्यादी कागदपत्रे बनवत आणि त्या कागदपत्राच्या आधारे ओरिजनल आधारकार्ड, पॅनकार्ड बनवून घेत आणि त्यानंतर ते घुसखोर या ओरिजनल आधारकार्ड आणि पॅनकार्डच्या आधारावर पासपोर्ट बनवून घेत होते.

# पिंपरी चिंचवड विद्यापीठ - एनएसई अकादमीमध्ये शैक्षणिक सामंजस्य करार

## पीसीयुमध्ये शिकवले जाणार अर्थविषयक फिंटेक अभ्यासक्रम..!

**पिंपरी | प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये अर्थ व्यवस्थापन शिक्षणाची मागणी वाढली आहे. हे लक्षात घेऊन आर्थिक शिक्षण वाढीसाठी पिंपरी चिंचवड विद्यापीठाने (पीसीयु) महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. विद्यापीठाने एनएसई अकादमीसोबत नुकताच सामंजस्य करार केला आहे. पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे कुलपती हर्षवर्धन पाटील आणि एनएससी अकादमीचे सह-उपाध्यक्ष एस. रंगनाथन यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

आर्थिक व्यवस्थापनाची मागणी पाहता विद्यार्थ्यांचा अर्थ क्षेत्राकडे जाण्याचा कल वाढला आहे. यातून अर्थ क्षेत्राची कार्यपध्दती, फिंटेक या नव्याने उभारीस आलेल्या क्षेत्राकडे विद्यार्थी उज्ज्वल भविष्य आणि स्थैर्य प्राप्त करून देणारे क्षेत्र म्हणून पाहतो. या करारामुळे पीसीयुच्या विद्यार्थ्यांना फिंटेक, वित्तीय क्षेत्र आणि बँकिंग क्षेत्राशी संबंधित विशेष प्रशिक्षण एनएसई अकादमीतर्फे देण्यात येणार आहे.

वडगाव मावळ, साते येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठाच्या व्यवस्थापन शाखेकडून एनएसई अकादमी सोबत हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. जागतिक पातळीवर फिंटेक क्षेत्राची घोडदौड आणि व्याप्ती पाहता विद्यार्थ्यांना करीयरचे नवे दालन या करारामुळे उपलब्ध होईल, असा विश्वास एनएसई अकादमीचे एस. रंगनाथन यांनी व्यक्त केला.

वित्त आणि बँकिंगच्या क्षेत्रात विद्यार्थ्यांना आवश्यक कौशल्ये आणि विशेषज्ञता प्राप्त होण्यास मदत होईल अशी अपेक्षा रंगनाथन यांनी व्यक्त केली. यावेळी रंगनाथन यांनी पिंपरी चिंचवड विद्यापीठातील प्राध्यापकांना फिंटेक क्षेत्रासंदर्भात मार्गदर्शन केले.



### विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण

» विद्यार्थ्यांना वित्तीय क्षेत्राची संपूर्ण माहिती आणि प्रशिक्षण मिळणार आहे. एनएसई अकादमीच्या तज्ज्ञ प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवड विद्यापीठात विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण मिळण्याची संधी प्राप्त झाली आहे, असे विद्यापीठाचे कुलपती हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले. या करारामुळे वित्तीय व्यवस्थापनांच्या क्षेत्रातील सैद्धांतिक ज्ञान आणि व्यावसायिक समुहातील अंतर कमी होईल

# कंत्राटी कामगारांचा पालिका उतरवणार अपघाती विमा

## आठ हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांना होणार फायदा, 265 रुपयांत मिळणार 15 लाखांचे सुरक्षा कवच

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेत काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांसाठी आनंदाची बातमी आहे. महापालिकेत काम करणाऱ्या जवळपास आठ हजाराहून अधिक कर्मचाऱ्यांचा सुमारे १५ लाख रुपयांचा अपघाती विमा उतरवला जाणार आहे.

महापालिकेत काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांसाठी आनंदाची बातमी आहे. महापालिकेत काम करणाऱ्या जवळपास आठ हजाराहून अधिक कर्मचाऱ्यांचा सुमारे १५ लाख रुपयांचा अपघाती विमा उतरवला जाणार आहे. त्यासाठी कर्मचाऱ्यांकडून अवघे २६५ रुपये घेतले जाणार आहेत. ही माहिती महापालिकेचे मुख्य कामगार अधिकारी नितीन केंजळे यांनी दिली.

पालिका कायम कर्मचाऱ्यांसाठी समूह अपघात विमा योजना चालवली जाते. पूर्वी कर्मचाऱ्यांकडून १३६ रुपये घेऊन १० लाखाचा विमा उतरवला जायचा. मात्र, मागील वर्षीपासून रक्कम वाढवली आहे. वर्ग एक साठी २५ लाख, वर्ग दोनसाठी २० लाख, वर्ग तीन व चारसाठी १५ लाखांचा विमा उतरवला जात आहे. मात्र, ही योजना कंत्राटी कामगारांसाठी नव्हती. याबाबत मुख्य कामगार अधिकारी नितीन केंजळे यांच्या नियोजनाखाली पालिकेने कंत्राटी कामगारांसाठीही ही योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत नितीन केंजळे यांनी सांगितले की, कंत्राटी कामगारांचा विमा उतरवण्यासाठी कंपनीने तयारी दाखवली. त्यानुसार महापालिकेतील ठेकेदारही यासाठी तयार झाले आहेत. त्यानुसार विमा उतरवण्यास सुरुवात झाली आहे. ठेकेदारांच्या मार्फत विमा उतरवण्यात येत आहे.

पालिकेत कंत्राटी कमर्चारी आहेत. हे सगळे वर्ग चार मधील कर्मचारी आहेत. या लोकांना जोखमीची कामे करावी लागतात. यात काही कर्मचाऱ्यांचा मृत्यूदेखील होतो. परिणामी या लोकांचे कुटुंब उघड्यावर पडते. असे होऊ नये यासाठी १५ लाखाचा विमा उतरवण्याचा निर्णय आम्ही घेतल्याचे केंजळे यांनी सांगितले. केंजळे यांनी पुढे सांगितले की, अपघाती मृत्यू झाल्यास किंवा अपंग झाल्यास त्या त्या प्रमाणात ही रक्कम मिळेल. त्यासाठी कर्मचाऱ्यांना फक्त २६५ रुपये ५० पैसे द्यावे लागणार आहेत. हे काम ठेकेदारामार्फतच केले जाणार आहे.




**आठ हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांना होणार फायदा**

» पालिकेत जवळपास ८ हजाराहून अधिक कंत्राटी कमर्चारी आहेत. हे सगळे वर्ग चार मधील कर्मचारी आहेत. या लोकांना जोखमीची कामे करावी लागतात. यात काही कर्मचाऱ्यांचा मृत्यूदेखील होतो. परिणामी या लोकांचे कुटुंब उघड्यावर पडते. असे होऊ नये यासाठी १५ लाखाचा विमा उतरवण्याचा निर्णय आम्ही घेतल्याचे केंजळे यांनी सांगितले. केंजळे यांनी पुढे सांगितले की, अपघाती मृत्यू झाल्यास किंवा अपंग झाल्यास त्या त्या प्रमाणात ही रक्कम मिळेल. त्यासाठी कर्मचाऱ्यांना फक्त २६५ रुपये ५० पैसे द्यावे लागणार आहेत. हे काम ठेकेदारामार्फतच केले जाणार आहे.

> “ कंत्राटी कर्मचाऱ्यांचा अपघाती विमा उतरवण्याबाबत ठेकेदारांना सूचित करण्यात आले आहे. त्यानुसार ठेकेदारांनी या कामाला सुरुवात केली आहे. कामगारांना याचा चांगला लाभ होऊ शकतो. ठेकेदारांनी आणि कर्मचाऱ्यांनी याची गंभीरतेने दखल घेऊन याचा लाभ घ्यावा.
>
> \- नितीन केंजळे,मुख्य कामगार अधिकारी, पुणे महापालिका

# अनधिकृत बांधकामांवर महापालिकेचा बुलडोझर सुरूच

## महापालिकेच्या बांधकाम विभागाकडून बेकायदा बांधकामांवर धडक कारवाईचे सत्र सुरू आहे

**पुणे | प्रतिनिधी**

पोर्शे कार अपघात प्रकरणानंतर आणि शिवाजीनगर ड्रग्ज पार्टीनंतर महापालिकेच्या बांधकाम विभागाकडून बेकायदा बांधकामांवर धडक कारवाईचे सत्र सुरू आहे. हडपसर भागासह, कोथरूड, पौड रस्ता, शिवाजीनगर भाग आणि एफसी रस्त्यावरील अनधिकृत हॉटेल, बार आणि रेस्टॉरंटवर शुक्रवारी आणि शनिवारी (दि. ५ आणि ६) या दोन दिवसांत महापालिकेने पुन्हा कारवाई करत एकूण सुमारे ४७,४२० चौरस फूट बेकायदा बांधकाम जमीनदोस्त केले.

पुणे महापालिकेकडून एमआरटीपी १९६६ अन्वये कलम ५३ नुसार हडपसर, पुणे सोलापूर रस्ता, तसेच साडेसतरा नळी हडपसर येथे एकूण ११ अनधिकृत बार, रेस्टॉरंट, रूफटॉप हॉटेल तसेच अनधिकृत आरसीसी बांधकामांना महापालिकेकडून नोटीस बजावण्यात आली होती. मात्र संबंधितांनी स्वतःहून कोणतेही अनधिकृत बांधकाम काढून न घेतल्याने शुक्रवारी १८,७०० चौरस फूट अनधिकृत बांधकाम पाडण्यात आले. बांधकाम पाडण्यासाठी महापालिकेकडून ४ ब्रेकर, ४ जेसीबी, ५ ग्रॅस कटर, २० बिगारी यांच्यासह पोलीस विभागाच्या मदतीने कारवाई करण्यात आली. ही कारवाई बांधकाम विकास विभाग झोन क्रमांक एककडून करण्यात आली, तर शनिवारी अतिक्रमण विभाग बांधकाम विभाग तसेच डेक्कन पोलीस ठाणे यांच्याकडून संयुक्त कारवाई करत १२,६१० चौरस फूट इतके बांधकाम पाडले, तर कोथरूड, एफसीरस्ता, पौड रस्त्यावरील १६,११० चौरस फूट इतके बांधकाम पाडले. ही कारवाई झोन क्रमांक सहाकडून करण्यात आली.

पुण्यात ड्रग्ज पार्टी रंगल्यानंतर शहरातील बेकायदा पब, बार, रेस्टॉरंटवरील थंडावलेल्या कारवाईला पुन्हा एकदा जोर देण्यात आला आहे. गेल्या तीन ते चार दिवसांपासून शहरातील बेकायदा पब, बार, रेस्टॉरंटचे बांधकाम पाडण्याची धडक कारवाई सुरू आहे.




**या ठिकाणी केली कारवाई**

- » खान्देशी तडका ८०० चौरस फूट
- » खाना जंक्शन १०१० चौरस फूट
- » ऑक्सिजन कॅफे ५२०० चौरस फूट
- » ब्ल्यूस्टिक पूल २५०० चौरस फूट
- » आनंद फास्ट फूड १२०० चौरस फूट
- » ममता पराठा ८०० चौरस फूट
- » चाय अड्डा ७०० चौरस फूट
- » समृद्धी डायनिंग हॉल ४०० चौरस फूट

# शहरात तूर्तास पाणी कपात नाही!

## महापालिकेचे पाणी कपातीचे नियोजन तयार, पवना धरण क्षेत्रात दमदार पाऊस, पाणी पातळीत वाढ

**पिंपरी | प्रतिनिधी**

संपूर्ण शहराची तहान भागविणा-या पवना धरण क्षेत्रात चांगला पाऊस होत आहे. १५ जूननंतर पावसाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे धरणात पाण्याची पातळी वाढण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे तूर्तास तरी पिंपरी-चिंचवड शहराची पाणी कपात टळली आहे..

पिंपरी-चिंचवड शहराला मावळातील पवना, आंद्रा धरणातून पाणीपुरवठा केला जातो. संपूर्ण शहराची भिस्त पवना धरणावर आहे. शहरासह मावळ तालुक्यातील विविध गावांचा पाण्याचा मुख्य स्रोत पवना धरण आहे. महापालिका प्रशासनाने पाणीपुरवठ्याच्या तक्रारी वाढल्याने आणि समान पाणीपुरवठ्याचे कारण देत २५ नोव्हेंबर २०१९ पासून एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू केला. साडेचार वर्ष झाले तरी नागरिकांना एक दिवसाआड पाणी पुरवठा सुरू आहे. आंद्रा धरणातून निघोजे येथील बंधाऱ्यातून पाणी उचलून समाविष्ट भागातील नागरिकांना देण्यात येत आहे. परंतु, वाढत्या लोकसंख्येला पाणी कमी पडत असून, तक्रारींमध्ये वाढ होत असल्याचे महापालिका अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.



### .. तर नियोजन करायला हवे

» जुलै महिन्यात पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. पावसाचे प्रमाण कमी राहिल्यास उपलब्ध पाण्याचे नियोजन करायला हवे. त्यानुसार महापालिका पाणीपुरवठा विभागाकडून पाणी कपातीचे नियोजन केले आहे. त्यानुसार धरणात २०.१५ इतका पाणीसाठा आहे. जुलैमध्ये पावसाने उघडीप दिल्यास पाण्याचे योग्य नियोजन करावे लागणार आहे. त्यामुळे पाणी कपातीचे नियोजन केले असून त्यासाठी आयुक्तांशी चर्चा करून निर्णय घेतला जाणार असल्याचे पाणीपुरवठा अधिका-यांनी सांगितले.

पवना धरण परिसरात १ जूनपासून २९४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून, पाणीसाठा १९.०१ टक्के आहे. हा साठा २० जुलैपर्यंत पुरेल एवढाच आहे. गेल्या वर्षी जुलैच्या सुरुवातीला २०.१६ टक्के पाणीसाठा होता. तर, ४२३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली होती. या वर्षी ३४६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.

### लोकसंख्येमुळे तक्रारीत वाढ

» पिंपरी-चिंचवडला पवना आणि आंद्रा धरणातून पाणीपुरवठा केला जातो. मागील साडेचार वर्षांपासून एकदिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. शहरातील लोकसंख्या आणि भविष्यातील २०४५ पर्यंतची लोकसंख्या विचारात घेऊन पालिका आंद्रा, भामा आसखेड धरणातून २६७ दशलक्ष लीटर (एमएलडी) पाणी आणणार आहे. त्या पाण्यावरील प्रक्रियेसाठी चिखलीत जलशुद्धीकरण केंद्र उभारण्यात आले आहे. आंद्रा धरणातून निघोजे येथील बंधाऱ्यातून पाणी उचलून समाविष्ट भागातील नागरिकांना देण्यात येत आहे. परंतु, वाढत्या लोकसंख्येला पाणी कमी पडत असून, तक्रारींमध्ये वाढ होत असल्याचे महापालिका अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

“ पवना धरणात सध्या पुरेसा पाणीसाठा आहे. सध्याच्या उपलब्ध पाणीसाठ्यानुसार जुलै महिन्यात पाणी कमतरता भासणार नाही. जुलैमध्ये पाऊस पडण्याचा अंदाज आहे. तूर्तास पाणी कपातीची आवश्यकता नाही. जुलै महिन्यातील पावसाचा अंदाज घेऊन परिस्थितीनुसार पाणी कपातीबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

- शेखर सिंह, आयुक्त- पिंपरी चिंचवड महापालिका

सध्यस्थितीत शहराला दिवसाला ६१५ दशलक्ष लीटर पाणीपुरवठा करावा लागत आहे. महापालिका दिवसाला पवना धरणातून ५२०, आंद्रातून ८० आणि औद्योगिक विकास महामंडळाकडून (एमआयडीसी) १५ असे ६१५ दशलक्ष लीटर (एमएलडी) पाणी उचलून पुरवठा करत आहे. दरम्यान, हवामान विभागाच्या अंदाजानुसार यंदा चांगला पाऊस होईल. जुलै महिन्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडण्याचा अंदाज आहे. जुलै महिन्यात पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. त्यामुळे जर पाऊस चांगला झाला तर शहरावर असलेले पाणी कपातीचे संकट निश्चित टळणार आहे.

# भोसरी , पिंपरी, चिंचवड विधान सभा मनसे लढणार

## विधानसभेच्या निवडणुकीमध्ये पक्षाचे काम तळागाळामध्ये पोहोचवणाऱ्या कार्यकर्त्याला संधी

**पिंपरी | प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीचा काळ जवळ आला आहे, त्या अनुषंगाने पक्षाची संघटनात्मक बांधणी करतानाच, पक्षाच्या विविध अभियानांशी, आंदोलनाशी, नागरिकांना कशाप्रकारे जोडता येईल, याची नियोजनपूरक चर्चा झाली. तसेच नुकताच झालेल्या लोकसभेत अनेक मतदारांना कागदोपत्री गोंधळामुळे मतदानात अडथळे निर्माण झाले होते. ते पाहता नवमतदार नोंदणी अभियान जास्तीत जास्त प्रभावीपणे राबविण्याबाबतही नियोजन आखण्यात आले.



येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये शहरातील तिन्ही विधानसभा पिंपरी, चिंचवड, भोसरी, या पूर्ण ताकतीने लढवण्याच्या निश्चय केलेला असून तिन्ही विधानसभेमध्ये पक्षातील पदाधिकारी इच्छुक आहेत तसेच अन्य पक्षातील ही माजी नगरसेवक पक्षात येण्यासाठी उत्सुक आहेत, या संदर्भातही चर्चा झाली. तसेच येणाऱ्या सहा महिन्यांमध्ये निवडणुकीच्या अनुषंगाने पदाधिक कार्यकर्त्यांचे मार्गदर्शन शिबिर, तिन्ही विधानसभेमध्ये मेळावे, मतदार नोंदणी व शहरातील सर्वसामान्य जनतेला भेडसावणाऱ्या समस्येवरती पक्षाच्या वतीने मोठे आंदोलने करण्याचे नियोजन केलेले आहे.

### निवडून येण्याचा निकष व नागरिकांमधील प्रतिमा

» निवडून येण्याचा निकष व सर्वसामान्य नागरिकांमधील प्रतिमा यावरती येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये पक्षाचे काम तळागाळामध्ये पोहोचवणाऱ्या कार्यकर्त्याला संधी देण्याची मागणी बैठकीमध्ये करण्यात आली. लवकरच तिन्ही विधानसभेमध्ये मेळावे पदाधिकारी, वेगवेगळे मार्गदर्शन शिबिर, तसेच मतदान नोंदणी राबवण्याचे नियोजन केलेले आहे.

राज ठाकरे यांच्या आदेशानुसार पिंपरी, चिंचवड, व भोसरी, या तिन्ही विधानसभेमध्ये एक निरिक्षक पाठवलेले असून उमेदवाराचा,व पक्षाचा अहवाल लवकरच साहेबांना पाठवण्याचे नियोजन करण्यात येणार आहे, त्याप्रमाणे जे इच्छुक आहेत त्यांचा कार्य अहवाल लवकर सादर करण्याची विनंती करण्यात आली

या तिन्ही विधानसभेमध्ये प्रामुख्याने पक्षाकडून इच्छुक उमेदवार असून तिन्ही विधानसभेमध्ये अन्य पक्षातील इच्छुक उमेदवारांनी आमच्याशी संपर्क साधलेला असून प्रामुख्याने चिंचवड व पिंपरी विधानसभेमध्ये माजी नगरसेवक व नगरसेविका लवकरच मनसेच्या उमेदवारी वरती उभे राहण्यासाठी पक्ष प्रवेश करण्याच्या तयारीत असून योग्य वेळी त्यांचे नाव जाहीर केले जाईल.

# दूध उत्पादक शेतकऱ्यांचा अंत पाहू नका

## मुंबईचे दूध रोखू, स्वाभिमानीचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर बांगर यांचा इशारा

**पुणे | प्रतिनिधी**

राज्य सरकारने दूध उत्पादक शेतकऱ्यांचा अंत पाहू नये, लिटरला चाळीस रुपये बाजार भाव द्यावा. अन्यथा मुंबईला जाणारे दूध रोखले जाईल, असा इशारा पुणे जिल्हा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर बांगर यांनी जिल्हाधिकारी पुणे यांना पाठवलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

जिल्हाधिकारी पुणे यांना पाठवलेल्या निवेदनात प्रभाकर यांनी म्हटले आहे की, राज्य सरकारने राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी प्रति लिटर ३० रुपये आणि ५ रुपये अनुदानाची घोषणा राज्याचे दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली आहे. ३० रुपये दर हा खाजगी व सहकारी दूध संघानी शेतकऱ्यांना द्यायचा आहे आणि पाच रुपये अनुदान राज्य सरकार देणार आहे. परंतु शेतकऱ्यांची मागणी लिटरला ४० रुपये भाव द्यावा.

कारण दूध उत्पादन परवडत नाही. दुधाचा उत्पादन खर्च प्रचंड प्रमाणात वाढला आहे. दूध भुकटीचे बाजार भाव आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये कमी झाल्याचे कारण सांगून खाजगी व सहकारी दूध संघाने दुधाचे दर मोठ्या प्रमाणात कमी केले होते. त्याचा फटका दूध उत्पादक शेतकऱ्यांना बसत होता. त्यामुळे राज्य सरकारने हा निर्णय घेतला आहे.

या हीवेळी ३५ रुपये सुद्धा भाव शेतकऱ्यांना मिळणार नाही. कारण खाजगी व सहकारी दूध संघ ३० रुपये दर देतील, याची सरकार खात्री देणार आहे का? आणि ज्या अटी शर्ती लावलेल्या आहेत. त्या रद्द करणार आहेत का? तरच शेतकऱ्यांना याचा लाभ होऊ शकतो. असा सवाल स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पुणे जिल्हा अध्यक्ष प्रभाकर बांगर यांनी केला आहे. तत्कालीन उपाय योजनांच्या बरोबरच दीर्घकालीन दुध धोरण तयार करण्याची नितांत आवश्यकता आहे.



### 40 रुपये भाव घेतल्याशिवाय गप्प बसणार नाही

» दुधाला ४० रुपये दर दिल्याशिवाय स्वाभिमानी शेतकरी संघटना गप्प बसणार नाही. सरकारने याबाबत निर्णय न घेतल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन होईल. वेळप्रसंगी मुंबईला जाणारा दूध पुरवठा देखील रोखून धरला जाईल, असा इशारा देखील स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने देण्यात आलेला आहे

### मागण्या काय?

» दुधाचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी तत्कालीन उपाय योजनांच्या बरोबरच दीर्घकालीन दूध धोरण तयार करण्याची नितांत आवश्यकता आहे. दुधाला उत्पादन खर्चावर आधारित योग्य भाव मिळावा यासाठी उसाप्रमाणे दुधालाही एफ.आर.पी. आणि रेव्हेन्यू शेअरिंगचे धोरण लागू करावे, दूग्धमूल्य आयोगाची स्थापना करावी, पशुखाद्य आणि पशु औषधांचे दर नियंत्रित करावेत, खासगी आणि सहकारी दूध संघाना लागू होईल असा लुटमार विरोधी कायदा करावा, दुध भेसळ रोखावी, अनिष्ट ब्रँडवार रोखण्यासाठी एक राज्य एक ब्रँड धोरणाचा स्वीकार करावा, मिल्कोमीटर आणि वजन काट्यात होणारी दुध उत्पादकांची लुटमार थांबविण्यासाठी तालुका निहाय स्वतंत्र तपासणी निरीक्षकांची नियुक्ती करावी.

### अनुदानात वाढ करून ते प्रति लिटर 10 रुपये करावे

» गेले वर्षभर दुध दराबाबत शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीची भावना आहे. प्रति लिटर 10 ते 15 रुपयांचा तोटा सहन करून दुध उत्पादक शेतकरी दुध घालत आहेत. दुध उत्पादनातील वाढता तोटा सहनशक्तीच्या पलीकडे गेला आहे. राज्य सरकारने ही परिस्थिती लक्षात घेऊन नागपूर अधिवेशनात जाहीर केल्याप्रमाणे दुधाला किमान 35 रुपये दर द्यावा, बंद केलेले दुध अनुदान पुन्हा सुरु करावे, वाढता उत्पादनखर्च व तोटा पाहता अनुदानात वाढ करून ते प्रति लिटर 10 रुपये करावे तसेच अनुदान बंद काळात दुध घातलेल्या शेतकऱ्यांना या काळातील अनुदान द्यावे या मागण्या दुध उत्पादक शेतकरी संघर्ष समिती करत आहे.

# रांजणगावातील प्रदूषणाचा प्रश्न संसदेत मांडणार

## अमोल कोल्हे यांची ग्वाही : ढोक सांगवीच्या गावकऱ्यांनी मांडल्या व्यथा

**पुणे | प्रतिनिधी**

रांजणगाव औद्योगिक वसाहतीमधील महाराष्ट्र एनव्हायरो पॉवर ली. कंपनीच्या प्रदुषणासंदर्भात लवकरच संसदेत आवाज उठवणार असल्याची ग्वाही खासदार डॉ. अमोल कोल्हें यांनी दिली.

अमोल कोल्हें हे शिरूर तालुक्यात दौ-यावर आले असता निमगाव भोगी व ढोकसांगवी येथील ग्रामस्थ व पदाधिका-यांनी त्यांची भेट घेऊन रांजणगाव औद्योगिक वसाहतीमधील कंपन्यांच्या प्रदुषणाचा पाढा वाचला. ग्रामस्थांना आश्वासन देताना खासदार बोलत होते.

निमगाव भोगी गावात महाराष्ट्र एनव्हायरो कंपनीकडून दूषित पाणी सोडल्यामुळे पाण्याचे सर्व स्त्रोत दूषित झाले असून पिण्याच्या व वापरण्याच्या पाण्यासाठी धावपळ करावी लागत आहे.

पाणी उपलब्धत करुन द्यावें, यासाठी सरपंच उज्वला अंकुश इतके यांनी रांजणगाव औद्योगिक विभागाकडे पत्रव्वहार केल्याचे माजी सरपंच सचिन सांबारे यांनी सांगितले. दूषित पाण्यामुळे पिण्याच्या पाण्याचे व वापरण्याच्या पिण्याचे स्त्रोत खराब झाले आहेत. त्यामुळे पाणी देण्याबाबत औद्योगिक विकास महामंडळाने शब्द दिला होता. परंतु पाणी दिले जात नाही. त्यामुळे ग्रामस्थांची पिण्याचा पाण्याची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे.

गावात लोकांच्या आरोग्याचा व उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. जमीनी नापीक झालेल्या आहेत. पाणी मोठ्या प्रमाणात दूषित झालेले आहेत. त्या पाण्यामुळे लोकांना अनेक साथीचे रोग उद्धवले आहे. लोकांच्या उदरनिर्वाहचा प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला आहेत. लोकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

अशीच जर परिस्थिती राहिली तर गावात जनावरांसोबत माणसांचे जीवनमान धोक्यात येईल. भयावह परिस्थिती निर्माण होईल तरी कंपनीने घेतलेले वाढीव क्षेत्र रद्द करण्यात यावे, अशी माहिती कोल्हे यांना देण्यात आली. याबाबतचे निवेदन सरपंच उज्वला अंकुश इचके यांनी दिले आहे.

शिरूर-आंबेगाव कॉग्रेसचे अध्यक्ष यशवंत पाचंगे यांनी सांगितले की, रांजणगाव औद्योगिक वसाहतीमधील पेप्सिको, महाराष्ट्र एनव्हायरो पावर ली. टाटा बॅटरी, सिद्धार्थ स्टार्च प्रा. कंपन्यांमुळे ढोकसांगवी व निमगाव भोगी परिसरात पिण्याच्या पाण्याच्या विहिरींचे स्त्रोतच खराब झाले आहेत.



### पाण्याचे स्त्रोतच खराब व दूषित झाले

» प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडे तक्रार करुनही वेळीच कोणतीही दखल घेतली न गेल्याने पाण्याचे स्त्रोतच खराब व दूषित झाले आहेत. त्यामुळे नागरिकांना पाण्यासाठी मोठी आर्थिक झळ सोसावी लागत आहे. यशवंत पाचंगे व सचिन सांबारे यांचा हा तक्रारींचा पाढा ऐकून खासदार कोल्हे यांनी रांजणगाव औद्योगिक वसाहतीमधील कंपन्यांच्या प्रदुषणावर सखोल माहिती घेऊन लवकरच संसदेत आवाज उठवणार असल्याचे सांगितले.